# अंजनगाव 1500 बांगलादेशी रोहिंग्यांचे आश्रयस्थान?

**किरीट सोमय्यांचा आरोपानंतर प्रशासन अलर्ट मोडवर | जिल्हाधिकाऱ्यांकडून तडकाफडकी एसआयटी गठीत**





**महासागर प्रतिनिधी**

**अंजनगाव सुर्जी,( दि.9 )** – अंजनगाव सुर्जी हे बांग्लादेशी आणि रोहिंग्यांचे आश्रयस्थान बनले आहे. अंजनगाव सुर्जी तहसीलने सुमारे 1500 घसुखोर बांगलादेशी आणि रोहिंग्यांना भारतीय असल्याचा दाखला देण्यात आल्याचा धक्कादायक आरोप भाजप नेते व माजी खासदार किरीट सोमय्या यांनी केला आहे. याआरोपानंतर जिल्हा प्रशासन ॲक्शन मोडवर आल्याचे पाहायला मिळत आहे.अंजनगावात बांगलादेशी नागरिक आणि रोहिंगे बेकायदेशीरपणे राहत आहेत की नाही? याचा शोध घेण्यासाठी विशेष तपासणी पथक (एसआयटी) ची स्थापना करण्यात आली आहे. बांग्लादेशी रोहीग्यांना जन्मदाखले दिल्याच्या आरोपानंतर संपुर्ण यंत्रणा कामाला लागली असून यासंदर्भात एसआयडी गुप्तपावार्ता विभागाचे अधिकारीही दाखल झाले आहे.

किरीट सोमय्या यांच्या आरोपानंतर राज्य शासनाच्या आदेशावरुन जिल्हाधिकारी सौरभ कटियार, पोलीस अधिक्षक विशाल आनंद, यांनी तातडीने बैठक घेवून या विषयावर चर्चेअंती वरील तक्रारीची शहानिशा व सत्यता पडताळणी करण्याकरिता उपविभागीय अधिकारी, दर्यापूर (महसुल) यांचे अध्यक्षतेखाली चार सदस्यीय समितीची स्थापन केली आहे.

## समितीमध्ये यांचा समावेश

या समितीमध्ये उपविभागीय अधिकारी, दर्यापूर (महसुल), हे अध्यक्ष तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी, अंजनगाव सुर्जी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अंजनगाव सुर्जी, मुख्याधिकारी, नगर परिषद, अंजनगाव सुर्जी यांचा समावेश करण्यात आलेला आहे. सदर समिती वरील प्रमाणे केलेल्या तक्रारीची सखोल चौकशी करणार असून केलेल्या चौकशीचा अहवाल जिल्हाधिकारी, अमरावती यांच्या समक्ष सादर करणार आहे. समितीने केलेल्या चौकशीत काहीही आक्षेपार्ह आढळून आल्यास फौजदारी कार्यवाही करण्यात येणार आहे.

## काय म्हणाल्या तहसीलदार

या प्रकाराबाबत तहसिलदार पुष्पा सोळंके यांच्याकडून मिळालेल्या माहिती नुसार आतापर्यंत जन्म नोंदणी चे 569 आदेश करण्यात आले असून त्यात 485 आदेश हे मुस्लिम समाजाच्या नागरिकांचे असून 84 आदेश हे हिंदू समाजातील आहेत आणि सुमारे हजाराच्या घरात प्रकरण हे अजूनही पेंडींग आहेत. आदेश झालेली सर्व प्रकरण नियमाने कागदपत्रांची पूर्तता केलेली प्रकरणे आहे. आता या प्रकरणातील कागदपत्र बोगसपणे बनवली आहेत काय याबाबत तपासणी करण्यात येऊन यात जोडलेले शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र, नगर पालिका तथा ग्राम पंचायतकडून देण्यात आलेले नोंद नसल्याचे प्रमाणपत्र व इतर तस्सम कागदपत्र तपासणी करण्यात येणार आहे. आदेश देण्यात आलेल्या प्रकरणात नियमाने कामकाज झाले असून त्याबाबत वृत्तपत्र प्रसिद्धी व अर्जदारांचे बयान करूनच ते आदेश करण्यात आले असल्याचे तहसिलदार पुष्पा सोळंके यांनी सांगितले.

## एसआयटीच्या तपासात नेमकं काय समोर येणार?

तहसील कार्यालय अथवा महापालिकेकडून बनावट जन्म दाखले निर्गमित करण्यात आले आहेत की नाही? याचा तपास करण्याचे आदेश गृह विभागाने या समितीला दिले आहेत. आरोपामध्ये तथ्य आढळल्यास त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. घटनेचे गांभीर्य ओळखून भविष्यात असे प्रकार घडू नयेत, यासाठी उपाययोजना करण्याचे देखील गृह विभागाने म्हटले आहे. या एसआयटीच्या तपासात नेमकं काय समोर येणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पंचवटीतील ऑनलाइन चक्री जुगार अड्ड्यावर धाड

### टीव्ही, वायफाय बॉक्स जप्त

### गाडगेनगर पोलिसांची कारवाई



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.9 )** – शहरातील पंचवटी चौकात सुरू असलेल्या ऑनलाइन चक्री जुगार अड्ड्यावर गाडगेनगर पोलिसांनी (ता. 8) दुपारी 3 वाजता धाड टाकली. कारवाईत पोलिसांनी टीव्ही, वायफाय बॉक्स, अडॅप्टर जोडलेले, दोन रिमोट, कीबोर्ड, स्कॅनर जप्त केले आहेत.

यावेळी पोलिसांनी प्रशांत बुधाराम मेश्राम (42, दस्तूरनगर, अमरावती) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. आजच्या डिजिटल युगात लहान मुले आणि लहान मुलांमध्ये ऑनलाइन गेमिंगचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. विशेषत: ऑनलाइन गेमिंगच्या जगात अल्पवयीन मुलांचा सहभाग हा गंभीर चिंतेचा विषय बनला आहे. ही समस्या समाजातील विविध घटकांना जाणवत आहे. कारण केवळ मानसिक आरोग्यावरच परिणाम होत नाही, तर या गेम्सद्वारे आर्थिक फसवणूक आणि इतर धोक्यांनाही सामोरे जावे लागू शकते. पंचवटी चौकात ऑनलाइन चक्री जुगार अड्डा सुरू असल्याची गोपनीय माहिती गाडगेनगर पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी धाड टाकून कारवाई केली. तेथे काही तरुण जुगार खेळताना आढळले. पोलिसांनी प्रशांत बुधाराम मेश्राम (42, दस्तूरनगर) याला अड्ड्यावरून अटक केली. पोलिसांनी घटनास्थळावरून 10 हजार रुपये किमतीचा टीव्ही, जिओ कंपनीचा 3 हजार रुपये किमतीचा वायफाय बॉक्स, मॅक्सिकॉम टीव्ही बॉक्स, केबल, एक हजार रुपये किमतीचे अडॉप्टर, दोन रिमोट, कीबोर्ड, स्कॅनर, 600 रुपये रोख असा 15 हजार रुपयांचा माल जप्त केला आहे. पोलिस हेडकॉन्स्टेबल संजय भिल्ये यांच्या फिर्यादीवरून प्रशांत मेश्राम याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, टीव्हीवर ऑनलाइन चालणाऱ्या चक्री गेमला तितली–भावरा असेही म्हणतात. जिथे अशी माहिती आहे की, तुम्ही कोणत्याही आकृतीवर 20 रुपये खर्च केले तर तुम्हाला 120 रुपये मिळतील. या ऑनलाइन जुगारात अल्पवयीन मुलांचा अधिक सहभाग असल्याचे दिसून येत आहे.

# भाजी बाजार चौकातील मराठे हॉस्पिटलमध्ये आग

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.9 )**– स्थानिक भाजी बाजार चौकातील नेत्र चिकित्सक डॉ.नरेश मराठे यांच्या रुग्णालयात बुधवारी(दि.8) रात्री अचानक आग लागली. घटनेची माहिती मिळताच महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाला घटनास्थळी पाचारण करण्यात आले. दरम्यान या घटनेत रुग्णालयातील साहित्य जळून खाक झाले आहे. प्राथमिक अंदाजानुसार ही आग शॉर्टसर्किटमुळे लागल्याचे दिसून आले.

आग नियंत्रण आणण्यासाठी अग्निशमन विभागाचे दोन बंब घटनास्थळी पोहोचले होते. अग्निशमन विभाग प्रमुख सय्यद अन्वर, चालक इमरान खान, शेख सलीम, फायरमन काकडे, इंदर खान, शहबाजुद्दीन आदींनी अथक परिश्रमाने आग नियंत्रणात आणली. दरम्यान ही आग लागल्यानंतर रुग्णालय परिसरात बरीच खळबळ उडाली होती.सुदैवाने यात कुठलीही जिवीतहानी झाली नाही.

# पुन्हा एकदा मनपा आयुक्त टार्गेट

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.9 )**– महानगर पालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांच्या नावाने फेसबुकवर बनावट आयडी तयार करण्यात आली आहे. या आयडीद्वारे काहींना पैसे मागण्यांत आल्याचेही पुढे आले असले तरी मनपा आयुक्तांना याबाबत कोणतीही माहिती नव्हती. ज्यावेळी त्यांना कळाले, त्यावेळी त्यांना धक्का बसला. त्यांनी लगेच सायबर पोलिसांकडे या



प्रकरणी तक्रार दाखल केली. यापुर्वी माजी महापालिका आयुक्त आष्टीकर यांचाही बनावट आयडी बनविण्यात आला होता, हे विशेष.

प्रथम कलंत्रे यांच्या नावाने फ्रेंड रिक्वेस्ट पाठवली जाते. मनपा आयुक्तांचे नाव बघून कोणीही ती रिक्वेस्ट सहज स्विकार करतो. रिक्वेस्ट स्विकार झाल्यानंतर ज्याने ती पाठवली त्याला समाधान वाटते. काही वेळाने मनपा आयुक्तांकडून इंग्रजीत नमस्कार तुम्ही कसे आहात,असा संदेश पाठवला जातो. जर त्याला प्रतिसाद दिला तर फेक आयडीवरून काही कारणे सांगून पैसे मागितले जात आहेत. याबाबत मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांना विचारणा केली असता, त्यांनी मला जेव्हा बनावट आयडीबाबत कळाले तेव्हा मी पोलिसांकडे तक्रार केल्याचे सांगितले.

### नावाने फेसबुकवर बनावट आयडी

### आयुक्तांची सायबर पोलिसांत तक्रार

# जबरी चोरीतील सराईतला अटक

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 9 )**– फ्रेजरपुरा पोलिसांनी जबरी चोरीतील सराईत आरोपीला 8 जानेवारी रोजी अटक केली. कृष्ण प्रमोद सुर्यवंशी (19, रा. महेद्र कॉलनी, अमरावती) असे आरोपीचे नाव आहे. त्याच्या ताब्यातून 85 हजार रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

अमरावती शहर आयुक्तालयातील गुन्हेगारावर लक्ष देऊन कार्यवाही करण्याबाबत पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी आदेशीत केले होते. त्यानुसार पोलिस निरीक्षक निलेश करे, निलेश गावंडे यांच्या मार्गदर्शनात गुन्हे शोध पथकाचे अधिकारी व अमलदार हे हददीत लक्ष ठेवुन होते. दरम्यानच प्रदिप उर्फ मयुरेश नंथुजी ( रा. कपीलवस्तु नगर गल्ली क्र. 5) यांना सराईत गुन्हेगार कृष्ण सुर्यवंशीने मंगलधाम सोसायटी जवळील टेकडीजवळ नेले आणि काहीएक कारण नसतांना चाकुने जिवे मारण्याचा धाक दाखवुन मोबाईल व सुझुकी ॲक्सेस 125 मोपेड क्रमांक एमएच 27 डीजी 7413 ही जबरी चोरी करून घेतली. या घटनेच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपीविरुध्द गुन्हा नोंदविला.

# कौटुंबिक न्यायालयात वर्षभरात 921 खटले निकाली



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.9 )**– गेल्या वर्षी 2024 च्या सुरूवातीला कौटुंबिक न्यायालयात 1760 प्रलंबित खटले होते. तसेच जानेवारी ते डिसेंबर 2024 या कालावधीत एकूण 910 नविन प्रकरणे दाखल करण्यात आली. अशा 2670 प्रकरणामधील एकूण 921 प्रकरणांचा निपटारा करण्यात आला आहे. सदर प्रकरणे ही अमरावती कौटुंबिक न्यायालयाच्या कार्यक्षेत्र म्हणजेच अमरावती शहर व संपूर्ण अमरावती तालुका या भागातील आहेत.

वर्ष 2024 या कालावधीत कौटुंबिक न्यायालय, अमरावती येथे एकूण 48 प्रकरणांमध्ये आपापसातील वाद सोडवुन संबंधीत जोडप्यांचे संसार पुन्हा एकत्रित फुलविण्यात न्यायालयाला यश आले. सदर 48 प्रकरणांपैकी 39 प्रकरणांमध्ये न्यायालयीन कामकाज व समुपदेशन यांच्या माध्यमातून समेट घडून आला तर 9 प्रकरणांत वर्षभरात झालेल्या लोक अदालतीमध्ये संबंधीत पक्षकारांनी पुन्हा एकत्रित नांदण्याचा निर्णय घेतला.

**700 प्रकरणे निकाली**

सन 2024 या वर्षभरात वैवाहीक हक्कांची पुर्नस्थापनाकरणे, न्यायिक विलगीकरण, विवाह रद्द करणे व घटस्फोट या प्रकारची एकूण 700 प्रकरणे निकाली काढण्यात आली. तसेच सदर प्रकरणातील महीलांच्या दृष्टीने उदरनिर्वाहाचा प्रश्न सुटणे ही अत्यंत महत्वाचे असते. या वर्षभरात पोटगी मंजूर करणे, पोटगीची वसूली करणे याबाबातची एकूण 163 प्रकरणे निकाली निघाली. त्याबरोबरच पाच वर्षाहून अधिक जुनी 99 प्रकरणे तसेच 10 वर्षावरील अधिक जुनी सर्व प्रकरणे यांचा निपटारा करण्यात आला आहे. कौटुंबिक न्यायालयाचे न्यायाधीश रा.रा. पोंदकुले यांना सदर कामात विवाह समुपदेशक एस. एन. तेलरांधे, न्यायालयाचे प्रबंधक, व्यवस्थापक व सर्व कर्मचारी तसेच वकील संघाचे सर्व पदाधिकारी व सदस्य यांचे उत्तम सहकार्य लाभल्याने न्यायालयाच्या कामास गती मिळत आहे. तसेच वकीलसंघ अमरावती यांच्या यशस्वी पाठपुराव्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार 1 जानेवारी 2025 पासून अमरावती येथे अतिरिक्त कौटुंबिक न्यायालय कार्यान्वीत झाले असून त्यात पी. एन. राव यांची न्यायाधीश म्हणुन नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यामुळे कौटुंबिक न्यायालयाच्या कामकाजात अधिक गतिमानता प्राप्त होईल, अशी माहिती न्यायालयीन व्यवस्थापक धनंजय क्षीरसागर यांनी दिली.

# अखेर अडगाव शाळेच्या मुख्याध्यापकाचे निलंबन

### विषबाधा प्रकरणात कारवाईला सुरवात

**मदतनीस, स्वयपांकी यांच्यावर कारवाईची टांगती तलवार**



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि. 9 )** मोर्शी तालुक्यातील अडगाव येथे शालेय पोषण आहारातून 32 विद्यार्थ्यांना विषबाधा झाली होती. याप्रकरणी आठवडाभरानंतर प्राथमिक शिक्षणाधिकारी यांनी अडगाव शाळेचे मुख्याध्यापक दिनेश भागवत यांना निलंबन कारवाईचे आदेश 8 जानेवारी रोजी जारी केले आहेत. याच प्रकरणी शाळेतील मदतनीस व स्वयंपाकी यांनी सादर केलेला खुलासा अमान्य करून त्यांच्या पुढील कारवाईबाबतचे पत्र संबंधित शाळा व्यवस्थापन समितीला दिल्याची माहिती शिक्षण विभागाच्या सुत्रांनी दिली.

मोर्शी पंचायत समितीअंतर्गत येणाऱ्या अडगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत 28 डिसेंबर रोजी शालेय पोषण आहारातून 32 विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला होता. या घटनेत 18 गंभीर विद्यार्थ्यांना उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. या घटनेमुळे जिल्हा परिषद यंत्रणा हादरली होती.

या घटनेचे गांभीर्य लक्षात घेता झेडपीच्या सीईओ तथा प्रशासक संजिता महापात्र यांनी तातडीने इर्विन रुग्णालयात पोहोचून बाधित विद्यार्थ्यांची आस्थेने प्रकृतीची माहिती जाणून घेतली होती. तसेच खासदार बळवंत वानखडे यांनीही याप्रकरणी चौकशीचे आदेश दिले होते. यानुसार जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षणाधिकारी यांना चौकशी करण्याचे सीईओंनी आदेश जारी केले होते. दरम्यान, या प्रकरणाचा अहवाल शिक्षण विभागाकडे प्राप्त झाला आहे. या अहवालानुसार आहार शिजवणे, वाटप करणे, या सर्व बाबींवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी ही संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाची आहे. मात्र, यावर नियंत्रण ठेवण्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत मुख्याध्यापक दिनेश भागवत सेवा (वर्तवणूक) नियम 1967चा नियम 3चा भंग केल्याने निलंबन कारवाई केल्याचे आदेशात नमूद आहे. भागवत यांचे निलंबन कालावधीचे मुख्यालय धारणी पंचायत समिती देण्यात आले आहे.

# अमृतमहोत्सवी वडीलांना भेट दिली विशेष प्रजातीची गाय

### आंध्रप्रदेशातून आणले एक गाय व एक वासरु





**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.9 )**– येथील अतुल बनसोड यांनी आपल्या वडीलांच्या अमृतमहोत्सवी त्यांना आंध्रप्रदेशातून आणलेली विशेष प्रजातीची एक गाय व एक वासरु सप्रेम भेट दिले.

अतुल बनसोड यांचे वडील प्रभाकर बनसोड यांना गेल्या अनेक वर्षापासून आपल्या घरात गाय असावी अशी इच्छा होती. प्रभाकर बनसोड यांच्या कुटूंबियांनी त्यांचा अमृत महोत्सवी (75 वा) वाढदिवसानिमीत्त अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन केले होते. याच सोहळ्याच्या औचित्यावर अतुल बनसोड यांनी आंध्रप्रदेशातील काकीनाडा येथून नादिपथी गोशाला ट्रस्टमधून अत्यंत कमी उंचीची गाय व वासरु वडीलांना भेट देण्याकरिता आणले. अतुल बनसोडे यांनी आणलेली एक गाय व तीन वासरू 3 जानेवारीला अमरावतीत आणले. आपल्या वडीलांना माहित न होवू देता प्रभाकर बनसोड यांच्या अमृतमहोत्सवी सुरु असलेल्या साखळी पारायण सोहळ्यादरम्यान आपल्या वडीलांना गाय सप्रेम भेट दिल्या. ही अमूल्य भेट पाहून वडील प्रभाकर बनसोड यांच्या डोळ्यात आनंदा अश्रू तरळले. या कार्यक्रमात बुलढाणा जिल्ह्यातील जयपूर या गावावरून पादुका आल्या होत्या. त्याचंही भाविकांनी दर्शन घेतलं. नातवांनी वेशभूषा करून सर्वांचे लक्ष वेधले.

## अभ्यास करुन घेतला निर्णय

या कार्यक्रमात आगळीवेगळी गाय बघण्यासाठी व फोटो घेण्यासाठी नागरिकांची एकच गर्दी झाली होती. मोदी यांनी नुकतीच ज्या ठिकाणी भेट दिली होती, त्या गोशाळेशी संपर्क साधून अतुल बनसोडे यांनी संपूर्ण वेगवेगळ्या जातीच्या गायीची माहिती घेतली. त्यांना खात्रीशीर गाय आणायची होती. त्यामुळे त्यांनी संपूर्ण अभ्यास करून खात्री केली, ते ठिकाण गाठलं आणि एक गाय एक वासरू असे मेल फिमेल अमरावतीत आणले.

## फक्त अडीच ते तीन फुट उंचीची गाय

या गाईची उंची 24 इंच तर लांबी 33 इंच एवढी आहे. ही गाय जवळपास अडीच ते तीन फुटापर्यंत यांची उंची वाढते. या गाईला भारतात कुठलेही वातावरण सूट होते. ही गाय जवळपास 25 वर्ष जगते. या गाईला साधारण गाईप्रमाणेच कुठलाही चारा चालतो.

# गांजा तस्करी करणाऱ्याला अटक

### नागपुरी गेट पोलिसांची कारवाई



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.9 )** – दुचाकीवरून गांजाची वाहतूक करणाऱ्या एका आरोपीला नागपुरी गेट पोलिसांनी 8 जानेवारी रोजी रात्री अटक केली. सागर गणपत मसराम (34, रा. बजरग टेकडी, अमरावती, ह.मु. संजय नांदुरकर यांच्या घरी, अमरावती) असे आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी आरोपीच्या ताब्यातून गांजा व दुचाकी असा एकुण 1 लाख 7 हजार 600 रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पोलिस उपनिरीक्षक गजानन विधाते यांनी गुप्त माहितीवरून पोलिस पथकासह वलगाव रोडवरील जमजम हॉलच्या बाजुच्या गल्लीमध्ये जाऊन पाहणी केली असता, चेछे आरोपी सागर गणपत मसरामजवळ गांजा आढळून आला. पोलिसांनी त्याला ताब्यात घेवुन 4 किलो 760 ग्रॅम (कि.47600) गांजा व टि.व्हि.एस कंपनीची ज्पुपीटर वाहन क्रमांक एमएच 27 बीयु 8028 (कि.60 हजार) असा एकुण 1 लाख 7 हजार 600 रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त केला. सदर कार्यवाही पोलीस आयुक्त. नविनचंद्र रेडडी, पोलीस उपआयुक्त सागर पाटील, सहायक पोलीस आयुक्त अरूण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व पोलिस निरीक्षक हनमंत उरूलागोडावार, जर्नाधन साळुखे, पोलिस उपनिरीक्षक गजानन विधाते तसेच सोबत पोलिस हवालदार फुलचंद चंदेल, शिवनाथ आंधळे, आंनंद ठाकुर, दिनेश नांदे, इम्राण, दानिश इकबाल, राहुल रोडे, मोहन तायवाडे, किशोर रायकर यांनी केली.

# मेळघाटातील हत्ती पंधरा दिवसाच्या रजेवर

## थकलेल्या पायांची होणार सुश्रुषा ■ आरोग्यवर्धक, शक्तीवर्धक आहारही देणार

**मारोती पाटणकर**

**चुरणी,( दि.9 )** - मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत कोलकास येथील हत्ती 10 ते 25 जानेवारी या दरम्यान रजेवर गेले आहेत. वनअधिकाऱ्यांनी त्यांची ही रजा मंजूर केली आहे. त्यांच्या थकलेल्या पायांची या सुटीत सुश्रुषा केल्या जाणार आहे. हत्ती सफारी अंतर्गत पर्यटकांच्या सेवेत राबणाऱ्या सुंदरमाला, चंपाकली, लक्ष्मी आणि जयश्री या हत्तींना ही पंधरा दिवसाची विशेष रजा मंजूर करण्यात आल्यामुळे हत्ती सफारी यादरम्यान बंद राहणार आहे.

रजेवरील हत्ती 26 जानेवारीला आपल्या कामावर परतणार आहेत. यामुळे 26 जानेवारी पासून हत्ती सफारी पूर्ववत सुरू होणार आहे. रजा कालावधीत हत्तींच्या पायांचे चोपिंग केल्या जाते. त्यांच्या थकलेल्या पायांची सुश्रुषा केल्या जाते. यादरम्यान त्यांच्याकडून कुठलेही काम करून घेतल्या जात नाही. गरम पाणी, तेल आणि वेगवेगळ्या वनौषधींचा वापर करून या हत्तींचे पाय शेकल्या जातात. हत्तींचे पाय मजबूत व निरोगी राहण्याकरिता, त्यांच्या पायांना पडलेल्या भेगा भरून काढण्याकरिता सतत 15 दिवस त्यांचे पाय चोपिंग अंतर्गत शेकल्या जातात. तसेच आरोग्यवर्धक, शक्तीवर्धक आहार त्यांना दिल्या जातो. काम करताना, राबतांना थकलेल्या पायांना पडलेल्या भेगा भरून काढण्याकरिता, पाय मजबूत व निरोगी ठेवण्याकरिता ही सुश्रुषा केल्या जाते.





### मध्य भारतातील पहिली हत्ती सफारी

मध्य भारतातील पहिली हत्ती सफारी मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत कोलकासला सुरु आहे. या हत्ती सफारीला राजस्थान, गुजरातसह अन्य राज्यातील पर्यटकांनी पसंती दर्शवित आहेत. स्वदेशीसह विदेशी पर्यटकांचे ते आकर्षण ठरले आहे. हत्ती सफारीच्या निमित्ताने चंपाकली, लक्ष्मी, आणि सुंदरमाला नामक चार मादी हत्ती पर्यटकांच्या सेवेत असून वन व वन्यजीवांच्या संरक्षणार्थही राबत आहेत.

### जयश्री सेवानिवृत्त

यातील जयश्री नामक हत्ती सेवानिवृत्त झाली आहे. तिच्याकडून कुठलेही काम करून घेतल्या जात नाही. सेवानिवृत्तीनंतर तिला पेन्शन मंजूर असून या पेन्शन अंतर्गत तिला आवश्यक तो आहार पुरविल्या जात आहे. तिची आवश्यक ती सर्व काळजी वन अधिकारी घेत आहेत.

### असे आहे कार्यरत हत्तींचे वय

जयश्री, आकोट विभाग, 80 वर्ष, लक्ष्मी, आकोट विभाग, 58 वर्ष, सुंदरमाला, जारीदा (सिपना) विभाग 59 वर्ष, चंपाकली कुंड (गुगामल)विभाग,60 वर्ष.

# धारणीमध्ये आढावा बैठक, अचलपूर-परतवाड्याच्या समस्यांवर दुर्लक्ष?



**खासदारांकडून अपेक्षापुर्तीची अपेक्षा!**

**मोहम्मद अज़हरुद्दीन**

**अचलपूर, ( दि.9 )** - धारणी येथे 7 जानेवारी रोजी विविध विभागांची आढावा बैठक घेवून खासदार बळवंत वानखडे यांनी संबंधित विभागांना त्यांच्या प्रलंबित कामांना गती देण्याचे निर्देश दिले. मात्र, मेळघाटप्रमाणेच अचलपूर-परतवाड्यामध्ये अनेक समस्या खासदारांची वाट पाहत आहेत. खासदारांकडून अपेक्षापुर्तीची अपेक्षा जुळ्या नगरीतील जनतेला असताना खासदारांचे होत असलेले दुर्लक्ष येथील नागरिकांच्या नाराजीचे कारण बनत आहे.

अचलपूर आणि परतवाडा या जुळ्या शहरांमध्ये पाणीटंचाई, अतिक्रमण, अनियमित वीजपुरवठा आणि इतर समस्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. नगर परिषद, उपविभागीय अधिकारी कार्यालय, बस स्थानक, भूमिअभिलेख कार्यालय आणि महावितरणसह इतर विभागांमध्ये अनेक कामे रखडली आहेत. तरीसुद्धा खासदारांनी या शहरांकडे पाठ फिरवल्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये नाराजीचा सूर आहे.

### जनतेच्या तक्रारी

जुळ्या शहरांतील नागरिक अनेक वर्षांपासून त्यांच्या समस्यांवर उपाययोजना होईल या आशेत आहेत. नगर परिषदेने लादलेले अवास्तव कर, वाढती अतिक्रमणे, तसेच पाणी आणि वीजपुरवठ्यातील अनियमितता यामुळे जनता त्रस्त झाली आहे. खासदार अचलपूरमध्ये स्वतंत्र कार्यालय उघडतील आणि स्थानिक समस्यांवर लक्ष केंद्रित करतील, अशी येथील नागरिकांची अपेक्षा होती. मात्र, आजपर्यंत ना कार्यालयाची स्थापना झाली, ना कोणत्याही समस्यांचे निराकरण झाले.

### अश्या आहेत समस्या

- **अतिक्रमणाचा प्रश्न :** शहरात वाढत्या अतिक्रमणामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो आणि नागरी सुविधांवर परिणाम होतो.
- **वीज व पाणी पुरवठ्याची समस्या :** अनियमित वीज व पाणीपुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त आहेत.
- **प्रलंबित प्रकल्प :** नगर परिषद आणि महावितरणसह इतर विभागांतील अनेक प्रकल्प रखडलेले आहेत.
- **खासदार कार्यालयाचा अभाव :** अचलपूरमध्ये खासदारांचे कार्यालय नसल्यामुळे नागरिकांना आपले प्रश्न मांडण्यासाठी अडचणी येतात.

# एक्स प्यारा मिलिटरी स्नेहमिलन



## मल्टीपर्पज असोसिएशनचा द्वितीय वर्धापन दिन

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.9 )**- देशाच्या सेवेत विविध सैन्य सेवेतून निवृत्त झालेल्या वरुड तालुक्यातील माजी सैनिकांनी स्थापन केलेल्या एक्स पॅरामिल्ट्री असोसिएशनचा व्दितीय स्थापना दिवस स्थानिक साईबाबा मंदीरात साजरा करण्यात आला. ज्ञानेश्वरराव भुते यांच्या अध्यक्षतेत तर अनासाने, ताहिर अली खान, साहेबराव नेवारे, अरविंद बारस्कर, रामेश्वर माटे, असोसिएशनचे अध्यक्ष संजय जिचकार यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या या कार्यक्रमात गत वर्षात असोसिएशनने केलेली उल्लेखनीय कामे व येत्या वर्षातील नियोजनाबाबत चर्चा करण्यात आली. यावर्षी बी.एस.एफ सेवानिवृत्त झालेले रवींद्र देवळे, सिआरपीएफ मधुन रवी पापडकर आणि राजु वागले या सैनिकांचा सेवानिवृत्तीबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांचे अनुभव जाणुन घेण्यात आले. सोबतच नव्याने सैन्यात सामील झालेल्या तरुण व तरुणींचा यावेळी सत्कार करण्यात आला. त्यांना सैनिकाची कर्तव्ये, अधिकार व शिस्त याबद्दल मार्गदर्शन करुन त्यांचे मनोबल वाढविण्याच्या दृष्टीने त्यांना प्रमुख अतिथी मार्गदर्शकांनी मार्गदर्शन केले. यावेळी अमोल भुंबर (बीएसएफ), किसन लाड (सिआयएसएफ), चिराग कुशवाह (बीएसएफ), संकल्प नेवारे (सीआरपीएफ), रविंद्र पंधरे (सीआरपीएफ), ईश्वर चोबीतकर (बिएसएफ), नुतन गायकी (आयटीबीपी), निसर्ग साबळे (सीआरपीएफ), शिवम भद्रे (बीएसएफ), अभिषेक दंवडे (बीएसएफ), शुभम दंडाळे (सिआरपीएफ), हर्षल कुरवाडे (सीआरपीएफ), नितेश जावळे (सिआयएसएफ), सपना चव्हाण (आयटीबीपी), शितल कावनपुरे (बीएसएफ) या नव्याने सैन्यात सामील झालेल्या तरुण-तरुणींना प्रतिक चिन्ह व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा प्रत्येकाचा सत्कार करण्यात आला. एकुण 15 युवासैनिकांमध्ये 2 युवतींचाही समावेश होता हे विशेष. एक्स पॅरामिल्ट्री असोसिएशनच्या या स्थापना वर्ष कार्यक्रमाच्या निमित्तानेच कौटूंबिक स्नेहमिलन कार्यक्रमही साजरा करण्यात आला. यात कौटूंबिक कार्यक्रमात माजी सैनिकांचे कुटूंब सहभागी होवून मनोरंजनाचा आस्वाद घेतला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता विलास गोळे, चंद्रशेखर पाबळे, प्रदीप फुले, दिगंबर वंजारी, बंडू पैठणकर, सागर चव्हाण, रमेश देशमुख आदींनी अथक परिश्रम घेतले.

# महा.होमिओ डॉक्टर्स असो.चे 'कौन्सिल आपल्या दारी'

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.9 )**- महाराष्ट्र होमिओ डॉक्टर्स असोसिएशन द्वारे रविवार दिनांक 12 जानेवारी ला दुपारी 2 वाजता हॉटेल ग्रेस इन येथे 'महाराष्ट्र कौन्सिल आपल्या दारी' ह्या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. ह्या कार्यक्रमाकरिता प्रशासक डॉ.बाहुबली शहा (बारामती) मुंबई एम.सी.एच प्रशासक व संघटनेचे अध्यक्ष डॉ.राजीव रोडे, सचिव डॉ.मनोज चौधरी, आय.पी.पी.डॉ.प्रशांत अडगोकर, पूर्वाध्यक्ष फोरम अध्यक्ष डॉ.विवेक पिहूलकर व सर्व लेडीविंग चेअर पर्सन डॉ.दिपाली कपूर व कार्यकारणीतील सदस्य उपस्थित राहतील. विदर्भस्तरीय कार्यक्रमाचे आयोजन एम.सी.एच व एम.यु.एच.एस चे डॉ.गुणवंत डाहाणे, प्रकल्प प्रमुख डॉ. विक्की पिंजाणी, उप प्रकल्प प्रमुख डॉ.अहमद अली यांनी केले आहे. असे प्रसिध्दी प्रमुख डॉ. शितल आचार्य यांनी कळविले आहे.

# तालुकास्तरीय क्रीडा महोत्सव 10, 11 जानेवारीला

## सुमारे 700 विद्यार्थी व शिक्षक सहभागी होणार

**महासागर प्रतिनिधी**

**भातकुली, ( दि.9 )**- भातकुली पंचायत समिती अंतर्गत तालुकास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवाचे दिनांक 10 व 11 जानेवारीला सायत येथील संत गाडगेबाबा विद्यालयाच्या मैदानावर आयोजन करण्यात आले आहे.

दोन दिवसीय क्रीडा महोत्सवाचे उदघाटन आमदार रवी राणा यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून आमदार राजेश वानखडे यांची उपस्थिती राहणार आहे. विशेष अतिथी म्हणून सरपंच अन्नपूर्णा मानकर, उपसरपंच विशाल भट्टड यांची राहणार आहे. प्रमुख उपस्थिती गटविकास अधिकारी प्रविण वानखेडे, संस्थेचे सचिव अशोक चव्हाण, शा. व्य. समितीचे अध्यक्ष ब्रिजमोहन भट्टड, मंगेश मोहोड, गणेश कावरे, श्रीमती नुजरत अफरोज नासिर शहा, मुख्याध्यापिका पुष्पा रामावत, पोलिस पाटील अशोक राऊत यांची राहणार आहे. या क्रीडा महोत्सवात सुमारे 700 खेळाडू व खेळ शिक्षक सहभागी होणार आहे. यादरम्यान खेळाडूंना अल्पोपहार व जेवणाचीदेखील सोय करण्यात आली आहे. बक्षीस वितरण 11 जानेवारीला गटविकास अधिकारी प्रविण वानखेडे यांचे हस्ते होणार असून अध्यक्षस्थानी सरपंच अन्नपूर्णा मानकर राहणार आहे. तर प्रमुख उपस्थिती उपसरपंच विशाल भट्टड, शा. व्य. समितीचे अध्यक्ष मंगेश मोहोड यांची राहणार आहे.

# मराठी पत्रकार संघाकडून पत्रकारांचा सन्मान

## विविध भेट वस्तूचे वितरण



**महासागर प्रतिनिधी**

**हिवरखेड, ( दि.9 )**- पत्रकार दिनानिमित्त दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या स्मरणार्थ पत्रकार सन्मान सोहळा बिगिनर इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज हिवरखेड येथे जिल्हा मराठी पत्रकार संघ अंतर्गत असलेल्या मोर्शी तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने घेण्यात आला. या कार्यक्रमांमध्ये घरोघरी वृत्तपत्र वाटप करणाऱ्या मुलांना भेटवस्तू, शाल, श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. वृत्तपत्र क्षेत्रात काम करणाऱ्या तालुक्यातील पत्रकारांनासुध्दा यावेळी सन्मानित केले. या कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून ?ड.लीना धोटे (गहुकर) तर अध्यक्ष म्हणून ऋत्विक मालपे (संस्थापक डीएम एक्स ग्रुप महाराष्ट्र राज्य व रक्तदाता संघ) हे होते. तर व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून मोर्शी तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष गोपाल डहाके, ज्येष्ठ पत्रकार महादेवराव नवघरे, ज्येष्ठ पत्रकार बाळासाहेब इंगळे, सतीश धोटे, हिवरखेड सरपंच सविता मालपे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक रवींद्र वासनकर, पंजाबराव ढोरे, अरविंद आमले, वैशाली आमले, (प्राचार्य बिगीनर इंग्लिश स्कूल जूनियर कॉलेज हिवरखेड), अन्सार रहीम कुरेशी हिवरखेड नारायणरावजी भोजने हिवरखेड इत्यादी मान्यवर उपस्थित होते. सदर कार्यक्रमाला उपस्थित मोर्शी तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष गोपाल डहाके, उपाध्यक्ष नरेंद्र निकम , उपाध्यक्ष गजानन ढोंगे, सहसचिव जितेंद्र फुटाणे, कोषाध्यक्ष त्र्यंबकराव संभावित, मार्गदर्शक बाळूभाऊ इंगळे, महादेवराव नवघरे, प्रकाशभाऊ मेंढे, विजय नालट, नरेंद्र फसाटे, रुपेश वाळके, अश्विन सिनकर, विजय सुने, विशाल पितळे, संजय डहाके तथा तालुक्यातील पत्रकार अजय पाटील, गजानन हिरुळकर, संजय गारपवार, दिनेश मिश्रा, अरुण जोशी, अंबादास सिनकर, कैलास ठाकूर, बाबुराव पडोळे, विकास पाटील, श्रीकांत सिनकर, नरेंद्र सोनागोते इत्यादी पत्रकार उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संघाचे उपाध्यक्ष नरेंद्र निकम यांनी तर आभार प्रदर्शन संघाचे सहसचिव जितेंद्र फुटाणे यांनी केले.

# तालुक्यात अनधिकृत सावकारांची बजबजपुरी

## गोरगरिबांच्या गळ्याला फास | लालफितशाहीत अडकल्या अनेक तक्रारी

**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर बाजार,( दि.9 )**- कमी भांडवलात जास्त नफा मिळत असल्याने चांदुर बाजार तालुक्यात गावोगावी अनधिकृत सावकारांची बजबजपुरी वाढली आहे. त्यांना मंदीच्या काळातही 'अच्छे दिन' आले आहेत. मात्र वीस ते पंचवीस टक्क्यांनी व्याज भरणाऱ्या गोरगरिबांच्या गळ्याला फास लागून त्यांचा संसार उद्ध्वस्त होत आहेत. तर काही जण गुंडाच्या वसुली पथकाच्या भीतीने पळून गेले आहेत. या सावकारांना आळा घालण्यासाठी शासनाने अत्यंत कठोर पावले उचलणे गरजेची झाली आहे. शासनाला ठोस कारवाईकरिता कधी जाग येईल, असा सवाल सावकारांमुळे त्रस्त झालेल्या गोरगरीब जनतेकडून केला जात आहे.



चांदुर बाजार तालुक्यात गेल्या दहा ते पंधरा वर्षांपासून जमीन खरेदी-विक्रीचे व्यवहार मोठ्या प्रमाणावर झाले आहेत. त्यात बोगस व्यवहाराचे प्रमाण वाढले आहे. या व्यवहारातून काही जण कोट्यधीश झाले आहेत. मिळालेल्या पैशांतून काही जणांनी हा व्याजाचा गोरखधंदा सुरू केला आहे. दहा टक्क्यांपासून ते तीस टक्क्यांपर्यंत व्याजाने पैसे वाटले जातात. त्या मोबदल्यात कोरे धनादेश, घरे, शेती स्टँपवर लिहून घेतात. परंतु व्याजाचा दर भयानक असल्याने घेतलेली रक्कम कधीच फेडू शकत नाही. कालांतराने त्याच्या घराचे किंवा शेतीचे धमकावून खरेदीखत करून घेतले जाते. दहशतीच्या दबावाखाली कर्जदार काही बोलू शकत नाही, असे प्रकार तालुक्यात गेल्या दहावर्षांत अनेक घडले. तर काही जण सावकाराच्या भीतीने पळून गेले. काहींनी आत्महत्या केल्या; परंतु ते उघडकीस आले नाही. तालुक्यातील या प्रमुख गावांमध्ये हा सावकारकीचा व्यवसाय राजरोसपणे चालू आहे. सावकारकीच्या व्यवसायाचे जाळे आता खेड्यापाड्यांतही पोहोचले आहे. कमी रकमेत जास्त मलाई मिळत असल्याने या व्यवसायात प्रमाणात वाढ होऊ लागली आहे. सावकारांच्या हातात, गळ्यात सोने पाहिले तर मोजता येणार नाही हे किती वजनाचे आहे. मात्र काही कर्जदारांच्या घरातील आईच्या किंवा पत्नीच्या गळ्यात दोन वाट्यांचे मंगळसूत्रही राहिले नाही. तर काही तरुणांनी डान्सबारमध्ये जिवाची मौजमजा करण्यासाठी घेतलेल्या पैशामुळे त्यांच्या आई-वडिलांना सावकारांचे पैसे देण्यासाठी घरदार विकण्याची वेळ आली आहे.

विविध कारणांसाठी पैशांची गरज भासल्यास बँकेत किंवा एखाद्या पतसंस्थेत लगेच मिळत नाही. पर्यायाने छोटे मोठे व्यापारी, रेल्वे व इतर कामगार सावकारांकडे धाव घेतात.अनेक वेळा अशी प्रकरणे पोलीस ठाण्यात जातात. पण काही पोलीस सावकारांची बाजू घेऊन त्या कर्जदाराकडून वसुली करतात. गोरगरिबांना न्याय मिळवून देण्यासाठी पोलिसांनी आपल्या खाकी वर्दीचे इमान राखून झगडले पाहिजे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

> 'तालुका सहाय्यक निबंधक कोठे राहटर यांची माहिती घेऊन आपणास कळवितो.त्या कोठे राहतात मला चौकशी करू द्या.
>
> **शंकर कुंभार**
> **जिल्हा उपनिबंधक**
> **सहकारी संस्था,अमरावती.**

येथील सहायक निबंधक अमरावती ला मिटींग च्या नावावर दोन जिल्हे पार करून केवळ दोन दिवस चांदुर बाजार ला येतात. त्यानंतर पुन्हा शेगावला निघून जातात. कार्यालयात उपस्थित राहण्याची वेळ 9.45 असताना त्या दोन दिवसात पण 12 च्या नंतरच कार्यालयात उपस्थित राहत असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली. त्यामुळे अवैध सावकार विरोध कारवाई होणार नसल्याचे स्पष्ट संकेत दिसत आहे.

# खा.बळवंत वानखडे यांनी घेतला चिखलदरा पंचायत समितीचा आढावा



**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी,( दि.9 )** - जिल्ह्याचे खासदार बळवंत वानखडे यांनी चिखलदरा पंचायत समितीचा आढावा घेतला असून या बैठकीला खासदार बळवंत वानखडे, जिल्हा परिषदेचे माजी सभापती दयाराम काळे, तसेच जिल्हा परिषदेचे माजी सभापती महेंद्र गैलवार, राजेश सेमलकर, साधुराम पाटील, शेख जहीर, गटविकास अधिकारी भारसाकडे तसेच सर्व विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

खासदार वानखडे यांनी पंचायत समितीच्या सर्वच विभागाचा आढावा घेतला. त्यामध्ये बऱ्याच प्रमाणात अनियमितता आढळून आल्या. तसेच पशुसंवर्धन विभागाची झाडाझडती घेण्यात आली. शेतकऱ्यांना मक्का वाटापासंदर्भात चिखलदरा पशुधन अधिकारी यांना कुठल्याही प्रकारची माहिती नव्हती. कश्याप्रकारचे वाटप सुरू आहे, हे सुद्धा त्यांना माहीत नसल्यामुळे त्यांची खासदारांसमोर चांगलीच तारांबळ उडाली. खासदारांनीसुद्धा त्यांची चांगलीच कान उघाडणी केली. तसेच त्यांनी मक्का वाटपा संदर्भात ग्रामपंचायतला किंवा कुठल्याही प्रकारची माहिती शेतकऱ्यांना दिली नव्हती, हे सुद्धा उघड झाले. त्यामुळे खासदारांनी या संदर्भात त्यांना चांगलेच धारेवर धरले.

महिला बालविकास विभागाचासुद्धा त्यांनी आढावा घेतला. कुपोषणा संदर्भात माहिती जाणून घेतली कुपोषणाची सध्याची स्थिती काय आहे, या संदर्भात खासदारांनी माहिती जाणून घेतली. तसेच घरकुल योजनेची सुद्धा माहिती खासदारांनी जाणून घेतली. घरकुलाचे काम तत्काळ पूर्ण करावे असे आदेश खासदारांनी दिले, यासह अधिकाऱ्यांनी कामात कोणत्याही प्रकारची कामचुकारपणा करू नये, आपण पुन्हा पंचायत समितीचा आढावा घेणार असल्याचे सांगत, यानंतर पुढे अशा चुका सहन केला जाणार नाहीत, असा इशाराही खासदारांनी यावेळी दिला. सामान्य नागरिकांच्या कामांमध्ये कामचुकारपणा केलेला, मला आवडत नाही, नागरिकांची कामे तत्काळ पूर्ण करावीत खासदार वानखडे यांनी तालुक्यातील अंगणवाडी केंद्र ग्रामपंचायतीच्या इमारतीची माहिती जाणून घेतली. ज्या ठिकाणी ग्रामपंचायत कार्यालय निकृष्ट दर्जाचे असेल त्या ठिकाणी नवीन प्रस्ताव पाठवावे असे आदेश खासदार वानखडे यांनी दिले.

### मेळघाटातील समस्यांना प्राधान्य

मेळघाटात नेहमी गावकऱ्यांना साथरोगाची लागण होण्याच्या घटना होतात. साथरोग नियंत्रणात रहावे, असे निर्देश खासदारांनी यावेळी दिले. मेळघाटातील समस्या प्राधान्य सोडवण्यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत असे खासदार बळवंत वानखडे बोलताना म्हणाले.